राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम
(NRDWP) सपोर्ट ॲक्टीव्हीटी
अंतर्गत पथदर्शी संशोधन प्रकल्प
राबविण्यास मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्र.रापेका-५३११/प्र.क्र.९५/पापु-१५
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक ३१ मे, २०११

वाचा:- १)केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सूचना
२) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे पत्र क्र.भूसवियं/संविक/राग्रापेका/२/२०१०, दिनांक ०१.०१.२०११
३) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे पत्र क्र.भूसवियं/संविक/राग्रापेका/२८६/२०११, दिनांक ०८.०४.२०११

**प्रस्तावना:-**

केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २००९-१० पासून राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार स्त्रोत शाश्वती, पाण्याची गुणवत्ता व कुटूंब पातळीवर जलसुरक्षा यावर जास्त भर देण्यात आलेला आहे. तसेच या कार्यक्रमामधील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता अंतर्गत संशोधन व विकासाची कामे घेण्याची धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे केंद्र शासनाने निर्गमित केली आहेत.

राज्यातील एकूण क्षेत्रफळापैकी ८२% भूभाग हा बेसाल्ट (अग्निजन्य) खडकाने व्यापलेला असून १०% रुपांतरीत (Metamorphic) ४% गाळाचा (Sedimentary) व ४% वालुकामय (Alluviam) खडकाने व्यापलेला आहे. तसेच ८५% पेक्षा जास्त गावे/वाडया/वस्त्या भूजल आधारीत उद्‌भवांवर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत. राज्यातील वाढती लोकसंख्या, पर्जन्यमानाची दोलायमानता, कठिण पाषाण यामुळे भूजल संपत्ती शाश्वत ठेवणे हे एक आव्हान आहे.

राज्यात भूजल शाश्वता, प्रदुषण निमुर्लनाकरीता काही संशोधनात्मक प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. या संशोधनात्मक प्रकल्पांच्या फलनिष्पतीचा अभ्यास करुन त्या आधारे भूजलामध्ये सात्यत, गुणवत्ता राखण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना घेण्यास मदत होणार होईल. तसेच या प्रकल्पांच्या फलनिष्पती निकर्षाच्या आधारे भूजलासंबंधी पुढील धोरण ठरविणे सुकर होईल.

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सपोर्ट ॲक्टीव्हीटी अंतर्गत संशोधन व विकासाची धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे विचारात घेता भूजल प्रदुषण अभ्यास प्रकल्प राबविणे (Tackling Groundwater Pollution Study) आणि जलधर निर्धारण प्रकल्प राबविणे

(Aquifer Delineation) या संबंधीच्या संशोधन व विकास प्रकल्पांना शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सपोर्ट ॲक्टीव्हीटी अंतर्गत भूजल प्रदुषण अभ्यास प्रकल्प राबविणे (Tackling Groundwater Pollution Study)आणि जलधर निर्धारण प्रकल्प (Aquifer Delineation) या संबंधीचे संशोधनात्मक प्रकल्प संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचे मार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या संशोधनात्मक प्रकल्पाची रुपरेखा, प्रकल्प मंजूरी, अंमलबजावणी आणि यावर होणारा खर्च याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

(१) **भूजल प्रदूषण अभ्यास प्रकल्प - (Tackling Groundwater Pollution Study):-**

राज्यातील ८५% पेक्षा जास्त उद्भव भूजलावर आधारीत आहेत. खडकांचे प्रकार व त्यातील रासायनिक घटक, रासायनिक प्रदूषणास जबाबदार आहेत. तसेच बाहय घटक जसे की, रासायनिक खते, जंतुनाशके हे देखील भूजल प्रदूषणास जबाबदार आहेत. रासायनिक प्रदूषणाचे उगम, वितरण व प्रसार (movement) यांचा सखोल अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. याप्रकारचे प्रकल्प ठाणे, सांगली,जळगांव, नांदेड व बुलढाणा या ५ जिल्हयांमध्ये राबविण्यात यावा. या प्रकल्पांवर होणा-या एकूण ₹ २२.६८ लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

(२) **जलधारक भूस्तर निश्चितीकरण (Aquifer Delineation) :-**

जलस्वराज्य व महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प अंतर्गत जलधर आधारीत भूजल व्यवस्थापनाचे प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर जलधर स्तरावर पिण्याचे पाणी केंद्रबिंदू मानून Aquifer Delineation चे प्रकल्प हाती घेण्यात यावेत. याप्रकारचे प्रकल्प सोलापूर, नाशिक, उस्मानाबाद या तीन जिल्हयात प्रस्तावित आहेत. या प्रकल्पांवर होणा-या एकूण ₹ ११२.४८ लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**प्रकल्प मंजुरी आणि अंमलबजावणी :-**

उपरोक्त दोनही संशोधनात्मक प्रकल्पांना संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे हे मंजूरी देतील. तर या प्रकल्पाच्या अंमलबजावणी करीता जिल्हास्तरावर वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व विभागीय स्तरावर उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा हे अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करतील. या संशोधनात्मक प्रकल्पाच्या माध्यमातून प्राप्त होणारी फलनिष्पत्ती (Out-Come) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करतील.

**प्रकल्प निधीः-**

वरील संशोधनात्मक प्रकल्पाकरीता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सपोर्ट ॲक्टीव्हीटी करीता राखीव निधीमधून संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच वरील संशोधनात्मक प्रकल्प राबविणेसाठी संबंधित जिल्हयाच्या वरिष्ठ भूवैज्ञानिक व उपलेखापाल, भू.स.वि.यंत्रणा यांच्या संयुक्त नावे जिल्हा स्तरावरील राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात यावे.

आवश्यकता असल्यास प्रकल्पाचा काही भाग बाहय स्त्रोतांकडून (Out-Sourcing ) करुन घेण्यात यावा. सदरचे दोन्ही प्रकल्पाबाबतच्या फलनिष्पत्ती बाबतचा अंतिम अहवाल जुन २०१२ पर्यंत सादर करावा.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळ www.maharashtra.gov.in वर उपलब्ध करण्यात आला असून याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०५३११३४३०३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने

**( सु.वि. कोळेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक व औरंगाबाद विभाग
२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, सांगली, सोलापूर, नाशिक, जळगांव, नांदेड, बुलढाणा व उस्मानाबाद
४. सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सर्व
६. सहाय्यक संचालक (मविलेसे) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे, सांगली, सोलापूर, नाशिक, जळगांव, नांदेड, बुलढाणा व उस्मानाबाद
८. वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, ठाणे, सांगली, सोलापूर, नाशिक, जळगांव, नांदेड, बुलढाणा व उस्मानाबाद
९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१०. निवड नस्ती पापु-१५